**Mumbai Metropolitan Region Development Authority's Annual budget for 2024-25 approved in the 156th meeting of the Authority**

**Rs. 41,955.34 Crs is allocated in the budget for infrastructure projects across the MMR**

**Mumbai, 5th March 2024:**

The financial budget of MMRDA for the year 2024-25 and the revised budget for the year 2023-24 have acquired the necessary approval from the MMRDA Authority. They were submitted as per Section 23(1) for approval, and after thorough examination, the Authority has approved the budgets. The financial budget for 2024-25 is planned to fund infrastructure projects and other developmental directives, including the construction of new Metro Lines dedicated to the strategic expansion of the Metro network, Thane-Borivali Twin Tube Tunnel Road, the Underground Tunnel Road from Orange Gate to Marine Drive, Versova – Virar Sea Link, Thane Coastal Road, Growth Centers, Ramabai Ambedkar Nagar Slum Redevelopment, etc. Thus, the timely approval from the Authority allows MMRDA's progressive plans for infrastructure projects in and around the Mumbai Metropolitan Region to continue at a steady pace without any hindrance.

The estimated budget for the year 2024-25 was delivered in terms of receipt and expenditure, and the proper split up for the estimated figures was duly presented to the authority in the submitted budget. The total receipt for the year 2024-25 is estimated to be around Rs. 39,453.04 Crs, while the total expenditure is estimated to be Rs. 46,921.29 Crs. Therefore, a deficit of Rs. 7,468.25 Crs is estimated owing to the difference in numbers between total receipt and expenditure. Rs. 41,955.34 Crs, is allocated for the infrastructure projects, which exemplifies MMRDA's unwavering commitment to sustainable urban development and the elevation of connectivity across the MMR.

The Government of Maharashtra has facilitated the approval for raising loans to Rs. 60,000 Crs, while the proposal for raising an additional loan of Rs. 30,000 Crs is also received by the government. The additional loan amount will be systematically utilized to fund various infrastructure projects across the MMR. A loan of Rs. 30,593 Crs from the approved amount has been allocated by REC. Moreover, the government has guaranteed a loan of Rs. 12,000 Crs in the first tranche, while the proposal for the guarantee of Rs. 12,000 Crs in the second tranche is submitted for approval. Furthermore, the proposal for a loan of Rs. 50,301 Crs has been approved by M/s. Power Finance Corporation Limited. This loan will make significant contributions to the progress of the MMRDA's innovative infrastructure projects in the MMR. On the other hand, the Atal Setu, India's longest sea bridge was inaugurated by the Hon'ble Prime

Minister of India on 12th January 2024, and it has been open for public use since 13th January 2024. As this prestigious accomplishment of MMRDA substantially reduces the distance and travel duration between Mumbai and Navi Mumbai, it has received a stellar response from Mumbaikars. In addition to elevating connectivity to greater heights and promoting sustainability, it will also contribute to the revenue of MMRDA through toll collection.

Hon'ble Chief Minister of Maharashtra, Urban Development Minister, & the Chairman of MMRDA Shri Eknath Shinde expressed **"The MMR plays an important role in catalyzing growth across the state of Maharashtra, and it is currently setting the blueprint for sustainable urban development for not only our state, but also the entire nation, through MMRDA's brave new directions. We rely on MMRDA to lead the way for the MMR's infrastructure development and economic growth, and now, we have reinforced its vision for the sustainable future of the MMR by approving the budgets. MMRDA has garnered global recognition for its strategic integration of modern technology and innovation in infrastructure development. Thus, we have the utmost confidence in the unparalleled focus and fortitude of MMRDA to harness the funds methodically to complement its intuitive directives and achieve success in every one of them."**

Dr Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA said **"The MMR's path towards a sustainable future is laid down brick by brick through the visionary infrastructure projects of MMRDA. The citizens of the MMR depend on us to complete these projects on time, and the Government of Maharashtra has entrusted us to fulfil this noble goal. Therefore, the approval from the authority for the submitted budgets catalyzes the progress of our infrastructure projects, thereby contributing to the sustainable urban development of the MMR. The constant guidance from the Hon'ble Chief Minister of Maharashtra has been crucial to the consistent success of MMRDA, and Maharashtra's unprecedented growth under his impeccable leadership is an inspiration to everyone."**

**एमएमआरडीए करणार घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, 16575 झोपडपट्टीधारकांना मिळणार पक्की घरे**

**वांद्रे स्थानक(रेल्वे स्थानक)-बीकेसी-कुर्लास्थानक (रेल्वे स्थानक) पॉड टॅक्सीच्या स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक प्रणालीच्या निविदा प्रक्रियेसाठी मंजुरी**

**प्राधिकरणाच्या 156 व्या बैठकीत महत्त्वपूर्ण प्रस्तावांना माननीय मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री एकनाथ शिंदे यांची मंजुरी**

**मुंबई 05 मार्च, 2024:-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची 156 वी बैठक महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीमध्ये काही महत्त्वाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

1  घाटकोपर रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टीचा होणार पुनर्विकास_

प्राधिकरणाच्या 156व्या बैठकीत घाटकोपर रमाबाई आंबेडकर नगर येथील अंदाजित एकूण 331495.44 चौ.मी. (33.15 हे.) इतक्या जागेचा विकास करून तेथील अंदाजे 16,575 झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्यामुळे या भागाचा सुनियोजित विकास होऊन तेथील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत होणार आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमुळे पूर्व मुक्त मार्ग (इस्टन फ्री वे) विस्तार प्रकल्पाकरिता लागणाऱ्या जमिनीचा काही भाग रमाबाई आंबेडकरनगर झोपडपट्टीने बाधीत होणारी जमिन प्राधिकरणास विनामुल्य उपलब्ध होणार आहे. त्यासोबतच या योजनेमुळे प्राधिकरणास अंदाजित 5000 सदनिका उपलब्ध होणार आहेत.

2 वांद्रे स्थानक-बीकेसी-कुर्ला रेल्वे स्थानक मार्गावर चालणार पॉड टॅक्सी--

सद्यस्थितीत संकुलातील विविध कार्यालयांमध्ये सुमारे 4 लाखाहून अधिक कामगार / अधिकारी काम करत असून तेवढेच अभ्यागत म्हणून भेट देतात. वांद्रे-कुर्ला संकुलात कर्मचारी / अधिकारी अभ्यागत यामुळे मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून संकुलात प्रचंड प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. सदर प्रवाशी हे मुख्यत्वे करून पश्चिम उपनगरीय रेल्वेमधील 'वांद्रे स्थानकांतून'  व मध्य रेल्वेच्या कुर्ला व सायन रेल्वे स्थानकांतून मोठ्या प्रमाणात ये-जा करतात.

वांद्रे-कुर्ला संकुलाचा जागतिक स्तर आणखी उंचावण्याच्या दृष्टीने तसेच वांद्रे व कुर्ला या रेल्वे स्थानकांच्या शक्य तितक्या जवळ जोडणी करण्याच्या दृष्टीने वांद्रे-कुर्ला संकुलात स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक

परिवहन प्रणालीची (Automated Rapid Transit / Personal Rapid Transit) अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारे सर्वेक्षणे, रचना इत्यादींचा सखोल अभ्यास करून सल्लागारांनी वांद्रे-कुर्ला संकुलात स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक प्रणालीची संकुलात अंमलबजावणी करण्याबाबत अहवाल प्राधिकरणास सादर केला होता.

सल्लागारामार्फत तयार करण्यात आलेल्या स्वयंचलित सार्वजनिक जलद वाहतूक प्रणालीच्या तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अहवालास प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक परिवहन प्रणाली सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) तत्वावर अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजित रु.1016.38 कोटी च्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर कामासाठी आवश्यक असणा-या स्वतंत्र अभियंता (Independent Engineer) संस्थेची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

यानुसार स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक प्रणाली (पॉड टॅक्सी) ही वांद्रे कुर्ला संकुलामधून धावणार असून मार्गीकेच्या जाळ्याची (Network) लांबी 8.80 कीमी एवढी आहे असेल. त्यामध्ये 38 स्थानके असणार आहेत. ही टॅक्सी (PoD) ३.५ मी. लांब आणि 1.47 मी. रुंद तसेच 1.8 मी.उंच असेल. तसेच तिचा वेग हा 40 कि.मी. प्रति तास (कमाल) असेल. याची प्रवासी क्षमता सुमारे 6 प्रवासी प्रति. पॉड असेल. या साठी अंदाजित 5000 चौ. मी. चा डेपो वांद्रे-कुर्ला संकुलात प्रस्थावित आहे. याप्रकल्पामुळे वांद्रे किंवा कुर्ला स्थानक ते बीकेसी हा प्रवास अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

3 मुंबई मोनोरेल प्रकल्पातील दादर (पूर्व) स्थानकाचे नाव "विठ्ठल मंदिर" स्थानक करणेसाठी मान्यता-विविध लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्था यांच्या विनंतीनुसार मुंबई मोनोरेल प्रकल्पातील दादर (पूर्व) स्थानकाचे नाव "विठ्ठल मंदिर" स्थानक करणेसाठी मान्यता देण्यात आली आहे.

4 पुनरुत्थान योजनेच्या अंमलबजावणी करीता पाचपाखाडी येथील जागा हस्तांतरणास मान्यता--

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मौजे पाचपाखाडी, ठाणे येथील स.न. 156/1पै. व 157/1 पै. क्षेत्र 6990.00 चौ.मी या भूखंडाचे ठाणे महानगरपालिकेस नागरी पुनरुत्थान योजनेच्या अंमलबजावणी करीता हस्तांतरित करण्यात येणार आहे. ठाणे महानगरपालिकेस नागरी पुनरुत्थान योजनेच्या अंमलबजावणी करीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मौजे पाचपाखाडी, ठाणे येथील स.नं. स.न. 156/1पै. व 157/1 पै. क्षेत्र 6990 चौ.मी या भूखंडाचे हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

5 कल्याण बाह्यवळण रस्ता भाग 8 च्या (रुंदे रस्ता ते गोवेली रस्ता) बांधकामास 39.85 कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता-

विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत प्रकल्पांतर्गत कल्याण बाह्यवळण रस्त्याची संपूर्ण लांबी (भाग 1 ते 7) सुमारे 30 कि.मी. व रूंदी 30 मी. ते 45मी. असुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या (कडोंमपा) मंजूर विकास आराखड्यानुसार बदलापूर-कटाई रस्त्यावरील हेदुटणे गावापासून पुढे कल्याण शिळ रस्त्यास माणगांव येथे, मध्य लोहमार्गास कोपर रेल्वे स्थानकाजवळ, वसई-दिवा लोहमार्गास गांवदेवी गावाजवळ छेदून ठाकुर्ली, दुर्गाडी पुलापासून उल्हास/काळ्‌ू नदीस समांतर टिटवाळा ते रुंदे गोवेली पर्यंत आहे. कडोंमपा मार्फत कळविण्यात आलेल्या जमीन उपलब्धतेच्या तपशिलाप्रमाणे सदर रस्त्याचे बांधकाम 7 भागांमध्ये हाती घेण्याचे नियोजन आहे. कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-8 ची एकूण लांबी 1.00 कि.मी. व रूंदी 30 मी. आहे. सदर चे काम पुर्ण झाल्यानंतर त्या भागात होऊ घातलेल्या समृद्धी महामार्ग, वडोदरा- मुंबई महामार्ग तसेच अतिजलद गतीने दळणवळण होण्यासाठी कल्याण अहमदनगर हायवे यांना पुरक रस्ता म्हणून बाह्यवळण रस्त्याचा उपयोग होईल. कल्याण बाह्यवळण रस्ता भाग 8 च्या (रुंदे रस्ता ते गोवेली रस्ता) बांधकामाकरीता व त्या अनुषंगीक बाबींकरीता ₹39.85 कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

6 ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे परिवहन सेवा (TMT) यांच्या मालकीच्या बस डेपोसाठीच्या जागांवर अत्याधुनिक बस डेपोचा विकास व सभोवतालच्या शासकीय जमिनीवरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करून उपलब्ध होणाऱ्या मोकळया शासकीय जमिनीचा विकास प्राधिकरणामार्फत करण्यास दिली तत्त्वतः मान्यता—

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे परिवहन सेवा (TMI) यांच्या मालकीच्या बस डेपोसाठीच्या जागांवर अत्याधुनिक बस डेपोचा विकास व सभोवतालच्या शासकीय जमिनीवरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करून उपलब्ध होणाऱ्या मोकळ्या शासकीय जमिनीचा प्राधिकरणामार्फत विकास करण्यास  तत्त्वतः मंजुरी देत आहे. तसेच प्राधिकरणासाठी सविस्तर सर्वेक्षण करून प्रकल्प व्यवहार्यता अहवाल बनवणे, नियोजन प्रस्ताव तसेच वास्तुशास्त्रीय रचना करणे इत्यादी कार्यवाहीसाठी सल्लागाराची ई-निविदेद्वारे नियुक्ती करण्यास मंजुरी देत आहे.

ठाणे महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या सोबत संयुक्त भागीदारी तत्वावर विकास करण्यास तत्त्वतः मान्यता आली आहे.

तसेच ठाणे परिवहन सेवा (TMT) यांच्या मालकीच्या बस डेपोसाठीच्या जागांवर अत्याधुनिक बस डेपोचा विकास व सभोवतालच्या शासकीय जमिनीवरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन तसेच सदर शासकीय जमिनीवरील आरक्षणांचा विकास प्राधिकरणामार्फत करून ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात येईल तसेच सदर प्रकल्पासाठी लागणारा एकुण खर्च मोकळ्या होणाऱ्या शासकीय जमिनींच्या विकासातुन तसेच ठाणे परिवहन सेवा (TMT) च्या डेपाचा विकास करून भागविण्यात येईल व या प्रकल्पामध्ये प्राप्त होणारा अतिरिक्त निधी प्राधिकरणाचे उत्पन्न राहणार आहे.

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या 2024-25 साठीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाला प्राधिकरणाच्या 156व्या बैठकीत मंजूरी**

**महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री एकनाथ शिंदे यांनी सन 2024-25 साठी प्राधिकरणाचा रू. 46,921.29 कोटींचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक केले मंजूर**

***जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी रू. 41,955.34 कोटी इतकी तरतूद ***

**मुंबई, 5 मार्च, 2024:-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन 2024-25 साठीचा सादर करण्यात आलेला रू. 46,921.29 कोटींचे मूळ अर्थसंकल्प आज सादर करण्यात आले आहे. मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांना अधिकाधिक आणि जागतिक दर्जाच्या सेवा सुविधा उभारण्यासाठी सदर अर्थसंकल्पात सुमारे रू. 41,955.34 कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा.प्र. से. यांनी सादर केलेले अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष, श्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर केले आहे. सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजात सन 2024-25 साठी रू. 39,453.04 कोटी महसूल अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाकरीता सकारात्मक विचार करून प्राधिकरणास अनेक प्रकल्प राबविण्याकरीता सहाय्य केले आहे. प्रकल्पांचा अवाका पाहता प्राधिकरणाचे महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यकतेनुसार रू.60000 कोटी पर्यंतचे कर्ज उभारण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. तसेच प्राधिकरणाच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी अतिरिक्त रू.30000 कोटीचे कर्ज उभारणीसाठीचा प्रस्ताव आज प्राधिकरण्याच्या बैठकीत मान्य झाला.

**अपेक्षित उत्पन्नामध्ये-**

1) राज्यशासनाकडून मिळणारे दुय्यम कर्ज- रू. 1,735.00 कोटी

2) जमिनिची विक्री- रू. 1,178.00 कोटी

3) कर्जाऊ रकमा - रू. 27,865.00 कोटी

4) इतर जमा रकमा - रू. 1,003.86 कोटी

5) देखभाल व संचालन – जमा/ महसूल - रू. 926.39 कोटी

6) शासनाचे अनुदान / विकासहक्क हस्तांतरण - रू. 2,294.79 कोटी

7) नागरी परिवहन निधी (Urban Transport Fund) - रू. 4450.00 कोटी

यांचा समावेश असून याप्रमाणे एकूण रू. 39,453.04 कोटी उत्पन्न अपेक्षा आहे.

तर, खर्च सुमारे 46, 921.29 कोटी इतका आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे:-

1) प्रशासकीय खर्च - रू. 289.84 कोटी

2) देखभाल व संचालन खर्च - रू. 849.42 कोटी

3) कर्जे आणि अग्रीम - रू. 301.00 कोटी

4) सर्वेक्षणे व अभ्यास - रू. 198.62 कोटी

5) अनुदाने - रू. 360.95 कोटी

6) कर्जाऊ रकमा परतफेड - रू. 569.62 कोटी

7) कर्जाऊ रकमेवरील व्याज व इतर शुल्क - रू. 2,386.00 कोटी

8) प्रकल्पांवरील खर्च - रू. 41,955.34 कोटी

9) इमारत / संगणक खरेदी / फर्निचर- रू. 10.50 कोटी

**सन 2024-25 साठी सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात प्रामुख्याने मुंबई महानगर प्रदेशातील सार्वजनिक वाहतूक व पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर भर देण्यात येणार आहे. त्यानुसार सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातील रू. 41,955.34 कोटी इतका खर्च हा केवळ पायाभूत सुविधा प्रकल्पांवर करण्यात येणार आहे.**

*** त्यानुसार काही प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे आहेत.***

मेट्रो मार्गिका आणि मेट्रो भवन- जवळपास 17,000 कोटी

मुंबई पारबंदर प्रकल्पावरील वाहतूक निर्गमनाकरीता मुंबईकडील बाजूस शिवडी ते वरळी (पूर्व-पश्चिम) उन्नतमार्ग बांधणे - रू. 600.00कोटी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक - रू. 600.00 कोटी.

ठाणे ते बोरीवली (संजय गांधी राष्ट्रीय उद्यान) 4 पदरी भुयारी मार्ग - रू. 4000.00 कोटी

-मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी उन्नत/भुयारी मार्गाचे बांधकाम - रू. 2400.00 कोटी

सुर्या प्रकल्प, कवडास उन्नैयी बंधारा, सुर्या नदीवर पाच कोल्हापूर पध्दतीचे बांधकाम  काळू प्रकल्प, देहरजी प्रकल्प - रू.886.00 कोटी.

बाळकुम ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्गाचे (ठाणे कोस्टल रोड) बांधकाम करणे - रू.500.00 कोटी

छेडानगर-घाटकोपर ते ठाणेपर्यंत पूर्व मुक्त मार्गाचे विस्तारीकरण - रू.500.00कोटी

मुंबई, ठाणे व नवी मुंबई शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबरच विकास कामाच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेले प्रकल्प - रू.2322.00 कोटी

सन 2024-25  चा अर्थसंकल्प सादर करताना एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा. प्र. से. म्हणाले "**मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांना जागतिक दर्जाच्या सेवा सुविधा उभारण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत. ज्यामध्ये निधी उपलब्ध करणे म्हणजेच आर्थिक बाजू ही अत्यंत महत्त्वाची असते. प्राधिकरणात निधी उभारणीकरीता शासनाने वेळोवेळी मदत केली आहे. ज्यामध्ये महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य महत्त्वाचे आहे. शासनाचे सहकार्य आणि मार्गदर्शन प्राप्त होत असल्यामुळे प्राधिकरण अधिकाधिक सक्षम होत आहे. तर या वर्षी आम्ही सर्वाधिक रकमेची तरतूद ही पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केली आहे जी एकूण अर्थसंकल्पाच्या सुमारे रू. 46,921.29 कोटीं इतकी आहे. पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमुळे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात आमुलाग्र बदल घडणार आहे.**


प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पाबाबत माननिय मुख्यमंत्री, श्री. एकनाथ शिंदे यांनी असे संबोधले की, **एमएमआरडीएच्या माध्यमातून एमएमआर क्षेत्राचा विकास होत आहे. अशात अनेक रखडलेल्या प्रकल्पांना चालना देण्याच काम एमएमआरडीएमार्फत होत आहे. रमाबाई नगर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातून जवळपास १६,००० हजारहूंन जास्त झोपडपट्टी वासियांना त्यांची हक्काची घरे मिळणार आहेत. ठाणे कोस्टल रोड असो किंवा इतर पायाभूत प्रकल्पामधून शहरे एमएमआर एकमेंकाच्या अगदी जवळ येणार आहेत. असे अनेक प्रकल्प प्राधिकरणाने हाती घेतले आहेत. ज्यामार्फत पायाभूत सुविधांचा विकास केला जात आहे. त्याचबरोबर जास्तीत जास्त लोकांना सहज आणि सुलभ प्रवास करता यावा यादृष्टीने एम.आर.टी.एस. (Mass Rapid Transit System) अंतर्गत सुविधा उभारल्या जात आहेत. एमएमआरडीच्या अर्थसंकल्पातून असे प्रतित होत आहे की, हा अर्थसंकल्प सरकारने हाती घेतलेल्या गतिमान विकासाचा अर्थसंकल्प आहे.**











N
Proposed SCLR Phase-II
MTNL Metro Station (Line 2B)
Revised Alignment
Metro Line 2B
ILFS Metro Station (Line 2B)
INS Tower
Trident Hotel
US Consulate
MMRDA Pay& Park
NABARD
Jio World Centre
ICICI
Regional Passport Office
Bharat Diamond Bourse
IL & FS
Jio Garden
SBI
Bank of Baroda
MCA Stadium
NSE
Metro Line 2B
Metro Line 3
BKC Metro Station (Line 3)
Excise Dept.
SEBI Bhawan
Naman Chambers
Godrej BKC
ONGC
Canara Bank
Butterfly High
Metro Line 2B
ITO Metro Station (Line 2B)
RBI
City Park
GST Building
Family Court
MMRDA Old Building
Maxit
Bandra Railway Station
Bandra Court Bus Depot
Bandra Station
Indian Oil HQ
Kalanagar Junction
Metro Line 3
Equinox
Kurla
Kurla Station
Kurla Rly Stn
LBS Marg
Bhabha Hospital
Kurla Station
Sion Station
LEGEND:
Existing Suburban Line
Proposed Metro Line
Proposed Road Network
Proposed ARTS - upto 2026
Proposed Metro Station
Proposed ARTS Station
Existing Suburban Station